Silver Innings A new beginning ……………………………

***A Dedicated Website for Senior Citizens and their Family members***

# वरिष्ठ नागरिकांसाठी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी एका खास वेबसाईटचे उद्घाटन

आम्हाला कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, मुंबईमध्ये दिनांक १० एप्रिल २००८ रोजी ''**सिल्व्हर इनिंग्स**'' या नावाने वरिष्ठ नागरिकांसाठी एका खास आणि सर्वसमावेशक अशा वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले असून ही भारतातील सर्व वरिष्ठांकरीता एक ऐतिहासिक घटना आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या प्रेक्षागृहात या वेबसाईटचे उद्घाटन अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत **मुख्य अतिथी श्री. शैलेश गांधी** ('माहितीचा अधिकार' या कायद्याचे विशेषज्ञ) यांच्या हस्ते आणि सन्माननीय पाहुणे **श्री. जॉन थत्तील** (हेल्प एज इंडियाच्या पश्चिम विभागाचे प्रादेशिक संचालक) यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

**सिल्व्हर इनिंग्सचे** संस्थापक श्री. सैलेश मिश्रा या प्रसंगी म्हणाले की, ''वरिष्ठांसाठी सिल्व्हर इनिंग्स ही एक नवी सुरुवात आहे. सर्व वरिष्ठांसाठी वयस्क होणे हा एक सकारात्मक, समृद्ध व फलदायी अनुभव असावा यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. वरिष्ठ नागरिकत्वाकडे झुकताना ह्या नागरिकांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना ज्या अडचणींना सामोरे जावे लागते त्यातून मार्ग काढून त्यांच्या ' सिल्व्हर इनिंग्स'च्या दरम्यान सन्मानाने जगता यावे यासाठी आम्ही सदैव प्रयत्न करु.''

वरिष्ठांसाठी काम करण्याच्या तळमळीने व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या अनुभवाच्या जोरावर श्री. सैलेश मिश्रा यांनी नोकरीतील चांगल्या हुद्याच्या जागाही सोडल्या आणि ज्या ठिकाणी वरिष्ठ नागरिक व त्यांच्या कुटुंबियांना सर्वसमावेशक माहिती मिळेल अशा '**सिल्व्हर इनिंग्स**'ची स्थापना केली. स्वत:च्या अनुभवाने आणि अनेक वरिष्ठांनी सांगितलेल्या माहितीनुसार त्यांना असे जाणवले की, वरिष्ठांसाठी आवश्यक ती उपलब्ध माहिती अद्ययावत नाही किंवा अपूर्ण आहे. वरिष्ठांसाठी असलेल्या वेबसाईटवर मुख्यत्वे ज्या संस्था ती वेबसाईट काढतात त्या संस्थांबद्दलच अधिक माहिती आढळते; परंतु वरिष्ठांशी निगडित असलेल्या समस्या आणि इतर बाबींसाठी सर्वसमावेशक माहिती देणारी वेबसाईट अस्तित्वात नाही, म्हणूनच ''**माहितीचे सुपरमार्केट**'' अशी संकल्पना असणारी ही वेबसाईट वरिष्ठ नागरीकांसाठी निर्माण करण्यात आली.

''**पीपल फॉर सोशल कॉज फोरम**'' यांनी ना-नफा ना-तोटा तत्त्वावर पुढाकार घेऊन ' सिल्व्हर इनिंग्स' ही संस्था सुरु केली. ह्या वेबसाईटवर वरिष्ठांना आवश्यक असलेल्या सेवा व उत्पादनांच्या जाहिरातींमार्फत या कार्याला आवश्यक तो निधी गोळा केला जाईल आणि निरनिराळ्या सभासदत्वाचे पर्याय उपलब्ध असतील. श्री. सैलेश मिश्रा यांच्या नेतृत्त्वाखाली चार युवकांनी मिळून वरिष्ठ नागरीकांच्या सेवेसाठी या संघटनेची उभारणी केली. ह्या वेबसाईटद्वारे उत्पादक वृद्धत्व आणि सन्मानपूर्वक वृद्धत्वाकडे वाटचाल करण्यासाठी नवीन मंत्र सर्व वरिष्ठांना देण्याचा एक मोठा संकल्प या संघटनेने केला आहे.

## भारतातील वाढते आयुर्मान आणि सिल्व्हर इनिंग्स

सध्या भारतात जन्मदर कमी होऊन सरासरी आयुर्मान वाढल्यामुळे वरिष्ठ नागरिकांची संख्या जलद गतीने वाढत आहे. २०१० सालापर्यंत ६० वर्षे वयोमानापेक्षा जास्त असलेल्या नागरिकांची संख्या ९७.४ दशलक्ष असेल तर २०५० साली ही लोकसंख्या वाढून जवळजवळ ३३५ दशलक्ष होण्याची शक्यता असल्यामुळे २०५० साली भारतातील २०% पेक्षा जास्त लोकसंख्या ही ६० वर्ष किंवा त्याहून अधिक वय असलेल्या लोकांची असेल.

पूर्वीच्या एकत्र कुटुंबपद्धतीत ग्रामीण भागात वरिष्ठ नागरिकांना मिळणारा आधार आता मिळेनासा झाला आहे; तथापि, जीवनमान सुधारल्यामुळे शहरातील वरिष्ठ नागरिकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे.

**Corresp Add**: Bldg: C/22, Flat: 303, Sector: 8, Shantinagar, Mira Road, Mumbai, India 401107

**Website: www.silverinnings.com**

**Blog:** http://peopleforsocialcause.blogspot.com/

**Email: silverinnings@gmail.com**

**Mobile: 0091 9819819145**

वरिष्ठ नागरिकाची दिलेली व्याख्याच अतिशय दु:खदायक आहे ती अशी की, ''ज्या व्यक्तिला शरीराच्या हालचाली नीट करता येत नाहीत आणि त्याची ऐकण्याची, वाहन चालविण्याची, ताठ उभे राहण्याची, पायाने चालण्याची, स्पष्ट विचार करण्याची किंवा स्वत:ला मूलभूत आर्थिक आधार देण्याची क्षमता क्षीण झालेली आहे.'' जगभरात ५५ ते ६५ या वयोमर्यादेच्या व्यक्तिंना वरिष्ठ नागरिक असे संबोधले जाते. परंतु राजकारणात काम किंवा उद्योगधंदा चालविणाऱ्या ६० वर्षे वयापेक्षा जास्त असणाऱ्या व्यक्तिंना मात्र ही संज्ञा लागू नाही, हे एक मोठे आश्चर्यच आहे.

वरिष्ठ नागरिक हे प्रथम 'अनुभवाने वरिष्ठ' आहेत आणि 'नागरिक' म्हणून त्यांना सामाजिक व्यवहारात सहभाग घेण्याचा पूर्ण अधिकार आहे. पॅन इंडिया संदर्भातील वरिष्ठ नागरिकांचे मुख्य प्रश्न:

१) वरिष्ठ नागरिकांमधील गरीबी २) निरक्षरता ३) रोजगाराच्या संधी ४) परावलंबित्व
५) राहण्याची व्यवस्था ६) स्वास्थ्य समस्या आणि ७) शारीरिक दुबळेपणा

महिला, बालके, शिक्षण, एडस् सारख्या समस्या इत्यादी क्षेत्रात काम करणाऱ्या बऱ्याच गैरसरकारी संस्था (एन.जी.ओ.) व इतर संस्था कार्य करीत आहेत परंतू, वरिष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या संस्था अगदी हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या कमी असून त्यातील बहुतेक संस्था ह्या मुंबई, बेंगलोर, दिल्ली, कलकत्ता यांसारख्या मुख्य शहरांमध्येच कार्य करतात त्यामुळे या कार्याची व्याप्ती वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात गरज निर्माण झाली आहे.

केंद्रशासन वगळता इतर राज्य सरकारांनीसुद्धा वरिष्ठ नागरिकांच्या गरजांकडे दुर्लक्षच केले आहे. महिला आणि बालके, युवक व अल्पसंख्यांकांसाठी स्वतंत्र मंत्रीमंडळे आणि राष्ट्रीय आयोग नेमलेले आहेत आणि म्हणूनच वरिष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र मंत्रीमंडळ / स्वतंत्र राज्यमंत्री नेमण्याची आम्ही जोरदार मागणी करीत आहोत कारण त्याशिवाय वरिष्ठ नागरिकांचे प्रश्न समाधानकारकरित्या सोडवले जाणार नाहीत आणि त्यांना योग्य न्याय मिळणार नाही. राजकीय पक्षांना वरिष्ठ नागरिकांकडून 'विशेष फायदा' नसल्यामुळे हे पक्ष त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. परंतु राजकीय पक्षांनी हे लक्षात घ्यावे की वरिष्ठ नागरिकांचे प्रमाण २००१ साली एकूण लोकसंख्येच्या ७.५% होते व हे प्रमाण उत्तरोत्तर वाढतच जाणार आहे. तळागाळातील वरिष्ठ नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच त्यांच्यासाठी कार्य करणाऱ्या इतर संस्था, गट आणि व्यक्तिंना या कार्यासाठी एकत्र आणून भविष्यात स्वत:ची एक गैरसरकारी संस्था (एन.जी.ओ.) स्थापन करण्यासाठी हे **सिल्व्हर इनिंग्सचे** पहिले पाऊल आहे. प्रसारमाध्यमे सुद्धा वरिष्ठ नागरिकांच्या प्रश्नांबद्दल उदासीनच असतात. आमच्या कार्यास प्रसारमाध्यमांचा, ख्यातनाम व्यक्तिंचा (सिलेब्रिटीज) आणि उद्योजकांचा पाठिंबा मिळावा अशी आम्हाला आशा आहे. आमच्या संस्थेद्वारे इतर एन.जी.ओ., शासन आणि वरिष्ठ नागरिकांपर्यंत या संदर्भातील विविध समस्या पोहचविण्याचे आणि समाजाला वरिष्ठ नागरिकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील करणे हे महत्त्वाचे काम आम्ही हाती घेत आहोत.

www.silverinnings.com या वेबसाईटवर अधिक माहिती उपलब्ध असेल

कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करताना **श्री. सैलेश मिश्रा** म्हणाले की, ''आपल्या वरिष्ठ नागरिकांसाठी 'सिल्व्हर इनिंग्स' ही एक मौल्यवान भेटच आहे. या वेबसाईटद्वारे त्यांना स्वत:चे जीवन समृद्ध करुन समाजासाठी आणि देशासाठी महत्त्वपूर्ण योगदान देता येईल. ही वेबसाईट अधिक सर्वसमावेशक आणि संवादात्मक (इंटरॲक्टीव) व्हावी यासाठी ती सतत अद्ययावत ठेवण्यासाठी आम्ही प्रयत्न करु तसेच ही वेबसाईट यशस्वी होण्यासाठी जास्तीत जास्त वरिष्ठ नागरिक आणि त्यांच्या कुटुंबियांचा सहभाग आवश्यक आहे. वाढत्या आयुर्मानासंबंधी सुरु होणारा हा नवीन अध्याय आहे आणि लवकरच याद्वारे वरिष्ठ नागरिकांसाठी एक समर्पित एन.जी.ओ. स्थापन करण्यात येईल.

**आमच्या प्रयत्नांद्वारे वरिष्ठ नागरिकांना सुखी, शांततापूर्ण, आनंदी आणि सन्माननीय आयुष्य लाभेल अशी आम्ही आशा करतो.**

**Corresp Add**: Bldg: C/22, Flat: 303, Sector: 8, Shantinagar, Mira Road, Mumbai, India 401107
**Website: www.silverinnings.com**
**Blog:** http://peopleforsocialcause.blogspot.com/
**Email: silverinnings@gmail.com**
**Mobile: 0091 9819819145**